# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड,(नविन इमारत) छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी क्रं. 0240-2331913 फॅक्स क्रं. 0240-2331913

Web: www.jdheaurangabad.in Mail.ID : jdheaurpayunit@2021gmail.com


जा.क्र.शिससं/उशि/वेतन पथक/2025-26 2345 दिनांक 16/05/2025 19

## परिपत्रक / सुचना

वाचा १. मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र जा.क्र.उशिसं/वेतन निश्चीती/२०१६-१७/लेखा-३/४३१९ दि.३१/०३/२०१७

२. या कार्यालायाचे पत्र जा.क्र.ससं/उशि/औवि/वेतन पथक/वे.दे./२०१६-१७/१२९९दि.०५/०४/२०१७

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिससं/उशि/वेतन पथक/२०२०-२१/३०२१ दि.०२/११/२०२०

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयात 'नविन नेमणूक, नियमीत पदोन्नती, कालबध्द पदोन्नती / कॅस अंतर्गत लाभ सेवेमध्ये झालेली शास्ती, निलंबन,वेतनवाढ थांबणे इत्यादी कारणांमुळे थकीत वेतन अनूदानाचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात येतात.

सदरचे थकीत वेतन अनुदानाचे प्रस्ताव प्रदान करण्यासाठी एकसमान कार्यपध्दती असावी त्याअनुषंगाने संचालनालयाचे संदर्भ क्रमांक ०१ चे परिपत्रकानुसार याकार्यालयाने निर्गमित केलेले संदर्भ क्रमांक ०२ व संदर्भ क्रमांक ०३ च्या पत्राची प्रतही यासोबत आपणास सुलभ संदर्भाकरीता देण्यात येत आहे.

तरी संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे थकीत वेतन अनुदानाचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यापूर्वी संबंधीत महाविद्यायाचे आहरण व संवितरण (DDO) अस्थापना यांनी **वरिष्ठ लेखा परिक्षक, (उच्च शिक्षण ) छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडून त्यांचे स्तरावर प्रमाणित / तपासणी करुन घ्यावीत.**

तसेच आस्थापनेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अनूदान देयकाच्या मागणी प्रकरणी प्रचलित शासन नियमाप्रमाणे या कार्यालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर विहीत मुदतीत कार्यालयास सादर करावे तसेच सदर परिपत्रकाची अमलबजावणी काटेकोर पणे करण्यात यावी

सोबत :- संदर्भ पत्रे

**डॉ. रणजितसिंह कृ. निंबाळकर**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
छ. संभाजीनगर,विभाग, छ.संभाजीनगर.

प्रत, १. **कुलसचिव,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.

२. **प्राचार्य,** सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,विधी, अध्यापक, शारिरीक शिक्षण, समाजकार्य महाविद्यालये, छत्रपती संभाजीनगर विभाग यांना माहितीस्तव.

३. वरिष्ठ लेखा परिक्षक, (उच्च शिक्षण) अनुदान छत्रपती संभाजीनगर यांना योग्यत्या कार्यवाहीस्तव.

अनुदानित अशासकीय
महाविद्यालयामधील शिक्षक शिक्षकेतर
पदांचे वेतन पथकामार्फत होणारे
वेतन,भत्ते,व वेतन फरकाचे
प्रदानासाठी एकसमान कार्यपध्दती

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

उच्च शिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्य,पुणे

परिपत्रक जा.क्र. ~~उशिसं~~/वेतननिश्चिती/2016-17/लेखा-3/ ८३१९.

दि.31/03/2017

वाचा -१.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.१७.०५.१९९४

२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.१७.०२.२००७

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्य क्षेत्रातील सर्व प्रादेशिक कार्यालयादवारे अकृषी विद्यापीठे व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयासाठी वेतन अनुदान वाटप करण्यात येते.यासाठी वरील क्र.०१ येथील शासन निर्णयाने सहसंचालक,उच्च शिक्षण,हे पद प्रादेशिक प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. वेतन अनुदान वाटपासाठी वरील क्र.०२ नुसार वेतन पथकाची निर्मिती करण्यात आलेली आहे.हे पथक वेतन/भत्ते व वेतन फरकासाठी अनुदान मागणी संचालनालयाकडे सादर करते. मंजूर झालेल्या वेतन अनुदानाचा आहरण व संवितरण करण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालयाकडे आहेत. वेतन अनुदानाचे संवितरण करतांना सर्व प्रादेशिक प्रमुखांनी वरील शासन आदेशाच्या अनुषंगाने एकाच कार्यप्रणालीचा अवलंब करणे अभिप्रेत आहे. तथापि असे निदर्शनास आलेले आहे की, ही कार्यपध्दती प्रादेशिक विभागनिहाय भिन्न-भिन्न आहे. त्यामुळे वेतन अनुदानाचे अतिप्रदान वा अनियमित प्रदान होण्याची शक्यता निर्माण होते. वेतन वसुली संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात पंजाब स्टेट विरूध्द शफिक मसिह आणि इतर यांचे प्रकरणात निकाल देतांना वेतन अतिप्रदान वसुली प्रकरणी वसुलीची कार्यवाही करावयाबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

या अनुषंगाने सर्व प्रादेशिक विभागस्तरावर वेतनपथकामार्फत वेतन अनुदान वाटपासाठी एकसमान कार्यपध्दतीचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे. यासाठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

अकृषी विद्यापीठाच्या संलग्नीत अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर पदांचे वेतन अनुदान वेतन देयकानुसार दरमहा मंजूर करतांना वेतनपथकाचे खालीलप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

१. अकृषी विद्यापीठे व संलग्नीत अनुदानित महाविद्यालयाचे वेतन अनुदानासाठी दाखल केलेला प्रस्ताव प्रचलित शासन निर्णयानुसार असावा.

२. सदर प्रस्तावामध्ये वरिष्ठ कार्यालयाने वेळोवळी दिलेल्या सर्व आदेश व निर्देशानुसार कार्यवाही झालेली असावी.

३. वेतन पटावरील, सर्व पदांची सेवेतील प्रथम नियुक्तीची वेतननिश्चिती, सहसंचालक उच्च शिक्षण यांनी मंजूर केलेली वेतननिश्चिती लेखा अधिकारी, अनुदान कार्यालयाने वेतन पडताळणी केलेली असावी.

४. वेतन पटावरील, सर्व पदांना वेळोवेळी मिळालेली पदोन्नती, झालेली पदावनती, वरिष्ठ/निवड श्रेणी (कॅस) अंतर्गत लाभ व इतर अकार्यात्मक पदोन्नतीसाठी वेतननिश्चितीस सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाने मंजूरी दिल्यानंतर लेखा अधिकारी, अनुदान उच्च शिक्षण कार्यालयाने वेतन पडताळणी केलेली असावी.

५. सेवाकालावधीमध्ये झालेली शास्ती, निलंबन, वेतनवाढ थोपविणे, सेवाखंडीत करणे, वेतनवाढ बहाल करणे, विशेष वेतनवाढी आणि अग्रीम वेतनवाढी यासाठी वेतननिश्चितीस सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने मंजूरी दिल्यानंतर लेखा अधिकारी, अनुदान उच्च शिक्षण, यांनी वेतन पडताळणी केलेली असावी. त्याशिवाय वेतन फरकाची रक्कम अदा करण्यात येऊ नये.

६. सेवेतील प्रथम नियुक्तीची वेतननिश्चिती शिवाय प्रतिनियुक्ती अकृषी विद्यापीठे, अभ्यास रजेवर, शासनाकडे, शासकीय महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्थावर झाल्यास

त्याची अनुज्ञयता, सक्षम प्राधिकरणाची मान्यतासह धारणाधिकाराची पडताळणी करून त्या कालावधीतील नियुक्तीची वेतन निश्चितीस सहसंचालक कार्यालयाने मंजूरी देऊन लेखा अधिकारी, लेखा व अनुदाने, उच्च शिक्षण यांनी वेतन पडताळणी केलेली असावी.

विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण यांनी मंजूरी दिलेल्या वेतननिश्चितीस लेखा अधिकारी, लेखा व अनुदाने उच्च शिक्षण यांचेकडून पडताळणी करून घेतल्याशिवाय त्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये. वेतननिश्चितीप्रकरणे लेखा अधिकारी, लेखा व अनुदाने उच्च शिक्षण यांनी त्यांचेकडे प्राप्त झाले पासून पंधरा दिवसात निकाली काढावीत.

वरीलप्रमाणे एकसमान कार्यपध्दतीचा अवलंब सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयातील वेतनपथकांनी करावा. जेणेकरून वेतन अतिप्रदानाची शक्यता राहणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील न्यायनिवाडयाच्या अनुषंगाने वेतन वसुलीची प्रकरणे वेळीच प्रतिबंधित होतील. न्यायालयीन प्रकरणे उदभवणार नाहीत. यामुळे सेवानिवृत्त होताना कर्मचारी/अधिकारी यांचेवर होणारा आर्थिक व मानसिक त्रास कमी होईल.

(डॉ.धनराज माने)

शिक्षण संचालक,

शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत

१.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

२.सर्व लेखाधिकारी, लेखा व अनुदाने उच्च शिक्षण.

३.विद्यापीठ शाखा,महाविद्यालयीन शाखा,प्रस्तुत कार्यालय.

४.स्वीय सहाय्यक,सहसंचालक,प्रस्तुत कार्यालय.

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,**
**देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, (नविन इमारत) औरंगाबाद**
Web: www.jdheaurangabad.org.in Email : jdheaur_2007@rediffmail.com
फोन नं.- ०२४०-२३३१९१३ फॅक्स नं.- ०२४०-२३३१९१३

जा.क्र. ससं/उशि/औवि/वेतन पथक/वे.दे./२०१६-१७/1299 दि. ०५/०४/२०१७

प्रति,

**कुलसचिव**, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**प्राचार्य/संचालक**, सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, अध्यापक व विधी महाविद्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

**विषय :-** विद्यापीठ तसेच महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतनपथकामार्फत होणारे वेतन व भत्ते यासाठी एकसमान कार्यपध्दती लागू करणे बाबत.

**संदर्भ :-** संचालनालयाचे परिपत्रक क्रं.उशिसं/वेतननिश्चिती/२०१६-१७/लेखा-१/४३१९ दि.३१.०३.२०१७

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, महाविद्यालयातील तसेच विद्यापीठातील शिक्षक / शिक्षकेत्तर यांचे नेमणूक, पदोन्नती, पदावनती, कंस अंतर्गत लाभ सेवेमध्ये झालेली शास्ती, निलंबन, वेतनवाढ थोपविणे इत्यादी बाबत देय होणारे वेतन व भत्ते तसेच वेतन फरकाचे प्रदान करण्यासाठी एकसमान कार्यपध्दती असावी या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले संदर्भीय परिपत्रक दि.३१.०३.२०१७ ची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे. दिलेल्या सूचनेनुसार कर्मचाऱ्यांच्या वरिल बाबी प्रकरणी सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीनंतर लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान कार्यालयाने वेतन पडताळणी केल्यानंतरच असे प्रकरण वेतनपथकास सादर करण्यात यावेत. यामुळे न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवणार नाहीत. तसेच कर्मचारी / अधिकारी हे सेवानिवृत्त होतांना त्यांचेवर होणारा आर्थिक व मानसिक त्रास कमी होईल.

RSDhamnaskar
06.04.17

**(डॉ. आर. एस. धामणस्कर)**
सहसंचालक,
उच्च शिक्षण,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत :-

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३. अनुदान विभाग १ ते ५, प्रस्तुत कार्यालय यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,**
**देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड,(नविन इमारत) औरंगाबाद**
दुरध्वनी क्रं. 0240-2331913 फॅक्स क्रं. 0240-2331913
डॉ. दिगंबर ध. गायकवाड Web : www.jdheaurangabad.in
सहसंचालक Mail.ID : jdheaur_2007@rediffmail.com

जा.क्र.शिससं/उशि/वेतन पथक/2020-21 3021 दिनांक 02/11/2020

प्रति,
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,
सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र आणि शा.शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

विषय :- थकीत वेतन/पदोन्नती/कॅस/न्यायालयीन प्रकरणे/स्टेपअॅप व इतर थकीत बाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पदोन्नती/कॅस व इतर सहसंचालक कार्यालयाकडून मंजूर झाल्यानंतर वरिष्ठ लेखा परिक्षक या कार्याकडून मान्यता प्रदान करण्यात येते.

सदरील मान्यता प्रदान करण्यात आल्यानंतर थकीत वेतन या कार्यालयास सादर करण्यात येत होती. वरील विषयी संबंधीताचे थकीत वेतन या कार्यालयास सादर करण्यासाठी वरिष्ठ लेखा परिक्षक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडून थकीत विवरणपत्राची पडताळणी करूनच या कार्यालयास सादर करण्यात यावे, वरिष्ठ लेखा परिक्षक यांची पडताळणी न झालेले थकीत देयके स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

2/11/2020
डॉ. दिगंबर ध. गायकवाड
सहसंचालक उच्च शिक्षण
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत:- वरिष्ठ लेखा परिक्षक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद